IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 7 SPECIAL ISSUE 3 FEBRUARY 2021

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

## GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

*Chief Editor*

**Dr. R. S. Funne**
*(Principal)*

*Editors*

**Dr. J. M. Bochare**
**Dr. M.U. Khedekar**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W).**

## अनुक्रमणिका


१. उच्च शिक्षण आणि महिला सक्षमीकरण
डॉ.कल्याण गोपनर | ०९

२. महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान
डॉ. प्रा. पवार सुरेखा विठ्ठलराव | १३

३. महिला सबलीकरणाची ऐतिहासिक दृष्टीकोनातून मिमांसा
प्रा.अनिल महादेव बोराडे | १६

४. बाबासाहेबांच्या जडणघडणीत रमाईचे योगदान
डॉ. लहू दिगंबर वाघमारे | २२

५. ७३ वी घटनादुरुस्ती व महिला सबलीकरण
डॉ. साहेब राठोड | २७

६. स्थानिक स्वशासनात महिला सबलीकरणाची भूमिका
डॉ. एम. एफ. राऊतराहे | ३०

७. रयत शिक्षण संस्थेच्या कार्यातील सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील ..
डॉ.संतोष तुकाराम कदम | ३६

८. पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग
रेणुका नवनाथ गवळी | ४३

९. स्त्रीवाद व महिला सबलीकरण
डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव | ४८

१०. भारतातील स्त्रीमुक्तीचा विचार
प्रा. सोळंके ए. ए. | ५२

११. महिलांचे मानवी अधिकार
डॉ. गजमल सुंदर | ५५

१२. बाबूराव बागूल यांच्या साहित्यातील स्त्री
डॉ. संतोष हंकारे | ५८

१३. ७३ घटनादुरुस्तीनंतर महिलांचे राजकारणातील स्थान
उषा उत्तम पवार / डॉ. साहेब राठोड | ६४

१४. स्त्रियांचे राजकारणातील स्थान
प्रा.मारोती कंधारे | ६९







१५. उद्योग क्षेत्रातील यशस्वी महिला उद्योजक
डॉ. जि.एन. सोनटक्के / डॉ. बी.एस. पवार | ७७

१६. ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोण ...
डॉ. श्वेता बा. चौधारे | ८०

१७. जागतिक स्तरावरील स्त्रीवाद : ऐतिहासिक आढावा
डॉ व्यास सी. पी. | ८७

१८. नोकरीच्या ठिकाणी होणारे महिलांचे लैंगिक शोषण
डॉ.अंभुरे एस. डी. | ९३

१९. पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग
कु. ज्योती बालासाहेब हारकाळ | ९७

२०. ७३व्या घटनादुरुस्तीच्या परीप्रेक्षातून महिला सशक्तीकरण एक शोध
इब्राहीम जमन तडवी | १०२

२१. भारतामधील यशस्वी महिला उद्योजकाचे गुण व कार्य ...
डॉ. बालासाहेब शिवाजी पवार | १०६

२२. भारतीय राजकारण आणि महिला
डॉ. लांडगे पी.एस. | १११

२३. भारतीय साहित्य आणि महिला सबलीकरण
शैला जगदंबे | ११७

२४. महिला सक्षमीकरणाची संकल्पना : योजना व उपाय
डॉ. बडुरे राजू सायन्ना | १२४

२५. महिला सक्षमीकरणात कायद्याचे योगदान
डॉ. तुकाराम रामराव फिसफिसे | १२९

२६. महिला सक्षमीकरणात सामाजिक माध्यमांची भूमिका : एक ...
डॉ. ज्योती पोटे | १३३

२७. महिला सबलीकरण आणि महिला उद्योजक
डॉ.मारोती धोडींबा कच्छवे | १४२

२८. महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक दृष्टीकोण
जोगदंड मयुरी रमेश | १५०

म. फुले, आदींनी केलेले स्त्रीवादी लिखाण हे भारतीय संस्कृतीतील अन्यायी पुरुषप्रधानतेच्या अनुषंगाने केलेले होते.

सतीच्या चालीविरुद्ध आंदोलन करणारे राजा राममोहन रॉय हे पहिले कृतीशील स्त्रीवादी विचारवंत म्हणून पुढे आले. सती प्रथेबरोबरच स्त्रियांवर होणाऱ्या सर्वच प्रकारच्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आंदोलन छेडले. मृत पतीच्या मालमत्तेत मुलांसोबत पत्नीलाही वाटा मिळाला पाहिजे असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी विधवाविवाहाचा पुरस्कार केला. समाजातील स्त्रियांची गुलामी ही पुरुषांच्या अहंकारामुळे निर्माण झालेली असून जोपर्यंत त्या शिक्षण घेत नाहीत तोपर्यंत ही गुलामी नष्ट होणार नाही. असे विचार राजा राममोहन रॉय यांनी मांडले. पुढे ईश्वरचंद्र विद्यासागर ह्यांच्या प्रयत्नसंतून विधवा पुनर्विवाहाचा कायदा संमत झाला.

**जागतिक पातळीवरील स्त्रीवादी साहित्यचळवळीतून मिळालेली प्रेरणा -**
सन १९६० नंतर मराठीत जे स्त्रीवादी लिखाण झाले त्याची प्रेरणा मात्र भारतीय संस्कृतीतील स्त्री पक्षपाताची चिकित्सा व त्याचबरोबर जागतिक पातळीवरील स्त्रीवादी साहित्य चळवळीतून मिळालेली प्रेरणा दिसून येते. स्त्रीवादी लेखन जरी १९४० ते १९५० च्या दशकांदरम्यान होऊ लागले तरी स्त्रीवादाची तात्त्विक बैठक ही मात्र १९७० च्या दशकाच्या आसपास मराठी वाङ्मयात स्वीकारली जाऊ लागली. आज स्त्री गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाली आहे.तरी पण तिला दुहेरी भूमिका पार पाडाव्या लागतात.नोकरी व घराची जबाबदारी तिलाच पार पाडावी लागते.

स्त्रीवाद म्हणजे लिंगभेदाचा विचार न करता एक माणूस म्हणून स्त्रीचा विचार करणे होय. ढोबळ मानाने ही चळवळ पुरुष विरोधी वाटली तरी ती मुलतः समानतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करते.

**संदर्भ-**

1. राजकिशोर, २००५, स्त्रीत्व का उत्सव, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली
2. "स्त्रीवाद." *विकिपीडिया*, 19 Jan. 2010, mr.wikipedia.org/wiki/.
3. अग्रवाल जे.सी., २००४, भारत मे नारी शिक्षा, विद्या विहार, नई दिल्ली

❀❀❀❀





18

# नोकरीच्या ठिकाणी होणारे महिलांचे लैंगिक शोषण

**प्रा. डॉ.अंभुरे एस. डी.**
इतिहास विभाग
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ. ता. सोनपेठ जि. परभणी.

प्रस्तावना:- वर्तमान काळात मुली उच्च शिक्षण घेऊन करिअर करू लागल्या, विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम करू लागल्या. परंतु तिच्या कुटुंबातले वातावरण अजूनही तसेच अठराव्या शतकातल्यासारखे आहे. करिअर करणाऱ्या स्त्रीच्या सासरी तिच्या करिअरला महत्त्व देणारे आहे समंजस वातावरण असेल तर ठीक अन्यथा नातेवाईक, नवरा आणि सगळा समाजच तिच्याकडे पारंपारिक दृष्टिकोनातून पाहतो आणि तशीच अपेक्षा करतो. तिचे शोषण करतो प्रसंगी अमानुष वागणुक देण्यासही कचरत नाही. आजही स्त्रीच्या बाबतीत अशीच परिस्थिती असेल तर कसली स्त्रीमुक्ती आणि कसले आत्मभान, स्त्रियांना मिळाले आहे.

याचाच परिणाम म्हणून एका प्रतिक्रिया व्यक्ती स्वतःच्या कल्पनेची ओळख झालेल्या स्त्रियांमध्ये हळूहळू निश्चित उमटते. मधल्या काळात स्त्री मनाच्या शक्यता असलेली नाती नाकरून एकटीच राहण्याचा पर्याय स्वीकारू लागली. महत्त्वाकांक्षी स्त्रिया तर करिअरच्या आणि विवाह यापैकी विवाह वर फुली मारून करिअरचा पर्याय स्वीकारू लागल्या आहे. लग्नानंतर 'बायको' म्हणून येणारे दुय्यमत्व नाकारू लागल्या.

वैवाहिक, कौटुंबिक जीवन नाकारून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अर्थाजन करण्यासाठी घराबाहेर पडलेल्या स्त्रियां कामाच्या ठिकाणी समाजात वावरत असतांना किती सुरक्षित आहे हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण हे एक प्रकारचे हिंसेचेच दुसरे रूप आहे. त्यात भेदभाव करण्याची, गैरफायदा घेण्याची वृत्ती ठासून भरलेली असून भीती, दहशत, धोका यांच्या बळावर ही प्रवृत्ती अजूनही फैललावताना दिसते.

संशोधन पद्धती:- अर्थाजन करणाऱ्या महिलांचे व्यवसायिक कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणाचा अभ्यास करण्यासाठी पुढील दोन पद्धती उपयोग केला आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत (Primary Source):- अर्थार्जन करणाऱ्या महिलांचे व्यवसायिक कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण याचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखती आणि अनुसूची या माध्यमांचा उपयोग करून तथ्य संकलन केले आहे.

ब) व्दितीयक स्त्रोत (Secondary Source):- स्त्रियांच्या लैंगिक शोषणावर लिहिलेली अनेक विचारवंतांचे पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिक, मासिक याद्वारे माहितीचे संकलन केले आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे:- (Objectives of Research):-

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख हे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांचे लैंगिक शोषणाचा अभ्यास करणे.
- कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक शोषणाचे कारण शोधणे.
- स्त्रियांचे लैंगिक शोषण थांबविण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**महिलांचे लैंगिक शोषणाचे स्वरूप:-** जगाच्या पाठीवर सर्व स्त्रियांना कधी ना कधी लैंगिक शोषणाचा /उपद्रवाचा सामना करावा लागतो. अश्लील शेरे, स्पर्श, शीळ, कटाक्ष वगैरे गोष्टी तर नेहमीच्याच असतात अर्थर्जन करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांनाही अशा अनुभवांना सामोरे जावे लागते अनेकदा पुरुषप्रधान कार्यक्षेत्रात पदार्पण करतांना स्त्रियांना त्यांचा जास्तच उपद्रव / शोषण होते असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.

लैंगिक शोषण हे अनेकदा अंतर्गत, धुपे आणि सर्व प्रकारच्या संघटनात अस्तित्वात असते हे हया अगोदर झालेल्या अभ्यास सर्वेक्षणवरून सिद्ध झाले आहे. तरीही त्याकडे एक समस्या म्हणून पाहिले जात नाही. त्याचे पायरी-पायरीचे उच्चाटण करण्याकडे कल दिसत नाही जवळपास काम करणाऱ्या 40 ते 60 टक्के स्त्रियांना भेडसावणारी ही समस्या आहे आणि स्त्रिया व नोकरदाते दोघांसाठीही तेवढीच काळजी करायला लावणारी बाब आहे.

"अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांना नोकरी ठिकाणी सहन कराव्या लागणाऱ्या लैंगिक छळास Women Sexual Harrsassment at Work Place (WSHWP) महिलांचे व्यवसायिक कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक संशोधन अशी संज्ञा आहे.





स्त्रीच्या मनाविरुद्ध केलेली कोणतेही शारीरिक जवळीकतेचा चा प्रयत्न "लैंगिक शोषण" या सदरात मोडतो. अगदी बॉसपासून, सहकारी, कनिष्ठ कर्मचारी ऑफिसमध्ये कामाला असलेली कोणीही व्यक्ती जर कोणत्याही प्रकारचे अशी मनाविरुध्द शारीरिक जवळीक साधन चा प्रयत्न करत असेल तर ते ह्याच प्रकारात मोडते.

स्त्रिायांसमोर अश्लील विनोद करणे, त्यांच्या दिसण्यावरून, पोशाखावरून भाष्य करणे, ऑफिसमध्ये काम करताना व्दिअर्थी भाषा वापरणे, स्त्री कर्मचाऱ्यांच्या मनावर विचित्र ताण येईल असे वागणे हे सर्व प्रकार लैंगिक शोषणामध्ये मोडतात. याशिवाय काम करतांना उगाचच स्पर्श करणे, रोखून पाहत राहणे, अप्रत्यक्षपणे शरीरसुखाची मागणी करणे या सर्व प्रकारांमुळे महिलांना कार्यालयात निरोगी वातावरण मिळू शकत नाही .त्यांच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होतो.

**लैंगिक शोषणाची कारणे:-**

1. बहुतांशी महिलांना आपले लैंगिक शोषण होत आहे हेच कळत नाही.
2. काही स्त्रिया स्वतःला दोषी मानतात
3. लैंगिक शोषणाला विरोध केल्यास आपली बदनामी होईल असे वाटते.
4. आपल्यावर झालेल्या अत्याचाराला न्याय मिळेल याचा विश्वास नसते.
5. वेळ, श्रम, पैसा यांची कमतरता असल्यास मनात आल्यामुळे अत्याचाराला, शोषणाला विरोध न करणे.
6. आत्मविश्वास कमी असणे हेही एक लैंगिक शोषणाचे कारण होऊ शकते.
7. लैंगिक शोषणाला विरोध केल्यास त्यांचा परिणाम आपल्या नोकरीवर, कुटुंबास होईल अशी भीती वाटल्यामुळे.

लैंगिक शोषणाला विरोध करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येईल.

प्रत्येक कार्यालयातील महिला कर्मचा-यांनी आपल्या कार्यालयात "महिला तक्रार निवारण समिती" आहे का, याची माहिती करून घेणे अत्यंत आवश्यक आहे कार्यालयीन लैंगिक शोषणाची तक्रार महिलेला आधी आपल्या कार्यालयाच्या "महिला तक्रार समिती "कडेच करणे बंधनकारक आहे. जर ही समिती योग्य कारवाई करत नसेल किंवा त्यास विनाकारण विलंब होत असेल तर महिला आयोग त्यात हस्तक्षेप करू शकतो, पण सर्वात आधी लेखी तक्रार कार्यालयातील महिला समितीकडेच करणे आवश्यक असते.

Women Complaint Committee कडे स्त्रीची तक्रार केल्यावर त्याची दखल घेऊन चौकशी प्रक्रिया पूर्ण व्हायला सहा महिने ते एक वर्षही लागू शकते. या काळात त्या स्त्रीला आपले मनोबल टिकवणे ही तारेवरची कसरत असते, आरोप-प्रत्यारोप, चर्चा होत असतात. प्रसंगी पुरुष कर्मचा-यांकडून या स्त्रीचेच चारित्र्य चांगले नाही, अप्रचार देखील केला जाऊ शकतो जोवर आपल्या समाजात स्त्री-पुरुष समानतेची कल्पना पूर्णपणे रुजत नाही व स्त्री ही उपभोग्य वस्तू नसून ती ही व्यक्ती आहे याचे भान समाजाला येत नाही तोवर अशा समस्या निर्माण होतच राहणार. यासाठी योग्य त्या कायदेशीर तरतुदी वर उल्लेखिलेल्या समित्या व सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पण सर्वात महत्त्वाची जबाबदारी समजत व आधुनिक युगात एकत्र काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांची आहे आपल्या कार्यालयातील वातावरण निरोगी असावे. लिंगभेदाचा पलिकडचे एक निखळ मैत्रीचे नाते स्त्री-पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये मध्ये असावे असा प्रयत्न नक्कीच करता येईल.

सारांश:- आज स्त्री मुक्ती चळवळीने 35 वर्षाचा काळ गाठला असला तरीदेखील भारतातील किंवा महाराष्ट्रातील सर्व थरांतील सर्व वर्गातील स्त्रिया या शोषणमुक्त आहेत असे ठामपणे सांगणे कठीण आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन समान संधी, समान दर्जा याद्वारे स्त्रियांचा विकास सर्व क्षेत्रात व्हायला हवा, पण हा विकास फक्त वैयक्तिक पातळीवर एकांगी असून चालणारा नाही. वैयक्तिक प्रगतीबरोबर ग्रामविकासाशी, समाजाशी असलेल्या तिच्या नात्यांचा मान समाजातील प्रत्येक व्यक्तीला देण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ -**


1. वर्तमानपत्रे.
2. मासिके.
3. स्त्रीप्रश्न : एक आर्वत-अंजली कुलकर्णी, नंदनी पब्लिकेशन हाऊस, पुणे.
4. भारतीय सामाजिक समस्या, डॉ. सुधा काळदाते, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स औरंगाबाद.
5. समाजातील समस्या, सुमन पाटे, विद्या प्रकाशन, नागपूर.
6. सामाजिक समस्या, रा.ज. लोटे, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, औरंगाबाद.


❁❁❁❁